e9


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com | दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org | फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


ई-मेल संदेश

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/६८१८/ 2555

दि 20 नोव्हेंबर,२०१८

## परिपत्रक

**विषयः- चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व खाजगी विद्यालये / महाविद्यालये / संस्था यांनी त्यांच्या प्रकाशनांची प्रत कृषी परिषद कार्यालयाकडे पाठविणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत २३५ विद्यालये, १८७ पदवी महाविद्यालये कार्यरत आहेत. यामध्ये खाजगी संस्थांची २०२ विना अनुदानित विद्यालये व १५३ विना अनुदानित महाविद्यालयांचा समावेश आहे. कार्यरत असलेल्या विद्यालय / महाविद्यालयांमधील सोयी-सुविधा, संस्थेकडून विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणारे उपक्रम इत्यादी अनेकविध बाबींसंदर्भात माहिती पत्रके, मासिके, त्रैमासिके प्रसिध्द करण्यात येतात.

मात्र या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यालय / महाविद्यालयाचा दर्जा योग्य नसल्यास याबाबत या पत्रकांमध्ये उल्लेख करण्यात येत नाही. यामुळे प्रवेशोच्छुक उमेदवार याबाबत अनभिज्ञ असतात. अशा पत्रक, मासिक, त्रैमासिकांची प्रत कृषी परिषदेकडे देण्यात येत नाही.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण / विस्तार शिक्षण / संशोधन इत्यादी कार्याचा प्रभावी समन्वय साधण्याचे कामकाज या कार्यालयाकडून करण्यात येते. यास्तव संस्थांकडून प्रसिध्द / प्रकाशित करण्यात येत असलेल्या पत्रक, मासिक, त्रैमासिकांची प्रत कृषी परिषद कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.

करिता राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या खाजगी विद्यालये / महाविद्यालये यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या पत्रक, मासिक, त्रैमासिक किंवा इतर काही प्रकाशने असल्यास त्यावर प्रवेश माहिती पुस्तिकेतील विद्यालय / महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक टाकावा. याचबरोबर विद्यालय / महाविद्यालयास कृषी विद्यापीठाने दिलेला दर्जा व सदर दर्जा दिल्याचे वर्ष नमूद करावे. प्रत्येक संस्थेने अशाप्रकारे

पत्रके / मासिके/ त्रैमासिके प्रकाशित करण्याची कार्यपध्दती अवलंबवावी. या पत्रकांची एक प्रत कृषी परिषदेकडे पाठवावी.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति,

प्राचार्य, कृषी विद्यापीठांतर्गत सर्व खाजगी विद्यालये / महाविद्यालये.

प्रतः-

१. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व खाजगी विद्यालये / महाविद्यालये यांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरच्या परिपत्रकास कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.